# वैद्यकीय अग्रीम बाबत

शासकीय कर्मचारी / अधिकारी यांच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्ती प्रकरणी ५ गंभीर आजारांमध्ये सर्व प्रकारच्या सर्व प्रकारच्या कर्करोगाचा समावेश करणे व ५ गंभीर आजारांवरील खर्च भागविण्यासाठी रु. १.००.०००/- एवढया अग्रिमाची मर्यादा रु. १,५०,०००/- पर्यंत वाढविण्याबाबत.

महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्रं. पमपजी-२००५ /प्र.क्र. २५१/आ-३ दिनांक १० फेब्रुवारी २००६

सदर शासन निर्णयान्वये १०० % अनुदानीत अशासकीय माध्यमिक शाळेतील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचा-यांना ५ गंभीर आजारासाठी रु. १,५०,०००/- पर्यंतचे अग्रिम मंजूरीचे प्रस्ताव संचालनालयास मंजूरीस्तव सादर केले जातात. त्यासाठी

## वैद्यकीय अग्रिम मंजूर होणेबाबत आवश्यक कागदपत्रे खालीलप्रमाणे

१. शिक्षणाधिकारी (माध्य) जिल्हा परिषद, यांची शिफारस
२. संबंधितांचा वैद्यकीय अग्रिम मागणी बाबतचा अर्ज
३. वैद्यकीय अग्रिम मंजूरीबाबत शाळेचे शिफारस पत्र
४. संबंधित कर्मचारी सेवेत कायम असल्याबाबतचे प्रमाणपत्र, तसेच संबंधित कर्मचा-याची १०० % अनुदान मान्यता प्रत
५. शाळा १०० % अनुदानावर असल्याचे शाळेच्या मुख्याध्यापकांचे प्रमाणपत्र तसेच शाळा १०० % अनुदानीत शासन मान्यता प्रत
६. विहित नमुन्यातील कुटूंब प्रमाणपत्र (कुटूंबातील व्यक्तीचे नांव नाते जन्मतारीख, व्यवसाय)
७. रेशन कार्डाची झेरॉक्स प्रत

८. संबंधित कर्मचा-याचे  आईवडील यांच्या वैद्यकीय अग्रिमाची मागणी असल्यास त्यांचे वार्षिक उत्पन्न किती! त्यांना निवृत्ती वेतन वगैरे मिळत असल्यास ते किती व ते संबंधित कर्मचा-यावर सर्वस्वी अवलंबून असल्याचे मुख्याध्यापकांचे प्रमाणपत्र

९. संबंधित कर्मचा-याचे अपंत्यांचे बाबतीतही ते सर्वस्वी संबंधीत कर्मचा-यावर अवलंबून असल्याचे मुख्याध्यापकाचे प्रमाणपत्र

१०. पती / पत्नी कोणत्या नोकरीत आहेत/नाहीत. नोकरीत असल्यास सदर खर्चासाठीची मागणी त्या आस्थापनेवरुन केली नसल्याचे मुख्याध्यापकांचे प्रमाणपत्र

११. लेखा परिक्षणात वैद्यकीय देयकाच्या रकमेची वसुली निघाल्यास सदर रक्कम एक रकमी वसूल करण्याबाबतचे हमीपत्र

१२. डॉक्टरांचे खर्चाचे प्रमाणपत्र (मूळप्रत) हॉस्पीटलने दिलेल्या प्रमाणपत्रावर ॲडमिशनची तारीख व शस्त्रक्रियेची तारीख वेगवेगळी नमूद करावी. हॉस्पीटलचे पत्रावर खाडोखोड नसावी.

१३. वेतनाचा दाखला.

१४. संबंधीत कर्मचा-याचे आईवडील यांच्या वैद्यकीय अग्रिमाची मागणी असल्यास सदर कर्मचा-यास भाऊ असल्यास व ते नोकरीत असल्यास सदर खर्चासाठीची मागणी त्या आस्थापनेवरुन केली नसल्याचे प्रमाणपत्र

१५. इतर कोणत्याही संस्थे्कडून मदत न घेतल्याचे प्रमाणपत्र

प्रस्ताव शस्त्रक्रियेपूर्वी किमान आठ दिवस आगोदर सादर करणे आवश्यक .

महत्वाचे : शस्त्रक्रियेनंतर अग्रीम दिले जात नाही.

वरील प्रमाणे आवश्यक कागदपत्रांसहीत दोन प्रतीत प्रस्ताव